# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१९२३/प्र.क्र.२२२/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १८ जानेवारी, २०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर.

विषय:- वनजमिन-पुणे
श्री क्षेत्र कानिफनाथ गड येथील मंदिर व इमारतीच्या विकासासाठी मौजे बोपेगाव, ता. पुरंदर, जि.पुणे येथील ३.३० हे. राखीव वनजमीन वळतीकरणाबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. डेस्क-१७/एफसीए-एस१/पीआयडी-४७९२८/ पुणे /७९९, दि.१४.०६.२०२३.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.११.२०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये वळतीकरणाच्या प्रस्तावामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेली पार्कींग, गार्डन इत्यादी अनुषंगीक बाबींसाठी अन्य वनेत्तर क्षेत्रावर प्रस्तावीत करता येईल का याबाबतची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने माहिती अद्यापही शासनास प्राप्त झालेली नाही. सबब, सदर प्रकरणी खालील मुद्यांची माहिती शासनास दिनांक ३१.०१.२०२४ पर्यंत सादर करावी:-

(१) सदरचा प्रस्ताव यापूर्वीच केंद्र शासनाने स्थळ विविक्षीत नसल्याने (Non-site specific) बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे कळविले होते. प्रकल्प यंत्रणेने आता सादर केलेला प्रस्ताव केवळ सन १९८० पूर्वी अस्तित्वात असलेल्या Structures च्या नुतनीकरणाचा / दुरूस्तीचा आहे की त्याव्यतिरिक्त इतर क्षेत्राचा देखील समावेश केला आहे. याबाबत माहिती सादर करावी.

(२) प्रस्तावामधील नकाशाचे अवलोकन केले असता, दत्त मंदिराच्या शेजारील बऱ्याचशा वन जमिनीवर इतर कोणतेही Structure असल्याचे दिसून येत नाही. सदर वनजमिन Garden व Toilet या कामांसाठी वळती करणे Site Specific होईल किंवा कसे, तसेच एवढ्या मोठ्या वनजमिनीची आवश्यकता आहे किंवा कसे, याबाबत माहिती सादर करावी.

(३) इतर विकास कामांसाठी ०.५० हे. वनजमिन प्रस्तावित केली आहे. सदर वनजमिनीवर प्रस्तावित केलेले गार्डन, भक्त निवास व त्याखालील पार्किंग, कॅन्टीन, साधना केंद्र, कम्युनिटी हॉल इ. कामे अन्य वनेत्तर क्षेत्रावर प्रस्तावीत करता येतील का, याबाबतची तपासणी करुन माहिती सादर करावी.

(४) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे जयतपाड, ता. पुरंदर, जि. पुणे येथील गट नं. १०२ मधील ३.३० हे. वनेत्तर जमिनीवर मोठ्या प्रमाणावर वृक्ष असल्याचे दिसून येतात. त्यामुळे तेथे वनीकरण करणे शक्य होणार नाही. सबब, सदर जमिन स्विकारून, प्रत्यक्षात वनीकरणासाठी सुयोग्य अशी अवनत वनजमीन प्रस्तावित करता येईल का, याबाबत माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे
२. उपवनसंरक्षक, पुणे
३. अध्यक्ष, श्री नवनाथ देवस्थान पंचायत समिती, बोपगांव, ता. पुरंदर, जि. पुणे.